**लक्षवेधी सूचना**

**अति तात्काळ**

**क्रमांक :** ९८९८९ **/ फ**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर.
दिनांक 19 DEC 2023

**प्रेषक :**

**सचिव-१ (कार्यभार),**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

**प्रति,**

**प्रधान सचिव,**
**परिवहन विभाग,**
मंत्रालय, मुंबई,

**विषय:-** **महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना**

**महोदय,**

सोबत दर्शविल्याप्रमाणे दिलेली लक्षवेधी सूचना मा.अध्यक्षांनी मान्य केली असून, उक्त लक्षवेधी सूचना सभागृहाच्या कामकाजात **दिनांक २० डिसेंबर, २०२३** रोजी दाखविण्यात आली आहे. या विषयावर **मा. मुख्यमंत्री** यांना सभागृहात **दिनांक २० डिसेंबर, २०२३** रोजी निवेदन करावयाचे आहे.

या निवेदनाच्या ७०० प्रती **दिनांक २० डिसेंबर, २०२३ पर्यंत** या सचिवालयाकडे पाठवाव्यात.

आपला,
सु.अ.परब
**कक्ष अधिकारी**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

सूचनेची प्रत :

(1) **श्री.लहू कानडे व इतर वि.स.स.**
(2) **मा.मुख्यमंत्री**
(3) **संगणक कक्ष**

## लक्षवेधी सूचनेची प्रत

## सुधारित प्रत

"राज्यात हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत केलेल्या सर्वेक्षणाअंती राज्यातील ५७७ बस स्थानकांपैकी ३९४ बसस्थानकांची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, तेथे प्रवाशांना आवश्यक त्या कोणत्याही सोयी-सुविधा पुरविण्यात येत नसल्याने प्रवाशांची गैरसोय होणे, राज्य परिवहन महामंडळाने सार्वजनिक खाजगी भागिदारी अंतर्गत "बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा" (बी.ओ.टी.) या धोरणानुसार बस स्थानकांचा पुनर्विकास करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी न होणे, सन २०१६ मध्ये परिवहन विभागाने राज्यातील बसस्थानकांचे बसपोर्टमध्ये रुपांतर करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येणे, मोक्याच्या जागा असलेल्या विविध बसस्थानकांच्या जागेचे मुल्यमापन करुन आराखडे तयार करण्याचे काम खाजगी कंपनीला देण्याचे निश्चित करणे, परंतु निविदा प्रसिध्द न झाल्याने सदरचे काम अद्यापही प्रलंबित असणे, त्यातच मुंबई सेंट्रल येथील राज्य परिवहन महामंडळच्या जीर्ण झालेल्या मध्यवर्ती इमारतीच्या पुनर्विकासाचा ४६१ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, दरम्यानच्या काळात तेथे छताचे प्लॅस्टर कोसळून दुर्घटना घडूनही अद्यापही त्याची दुरुस्ती करण्यात न येणे, उपरोक्त बसस्थानकांमध्ये दुरुस्ती व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी करण्यात येणे, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन राज्यातील राज्य परिवहन बसस्थानकांची दुरुस्ती व अद्ययावत सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**श्री.लहू कानडे, ॲड.आशिष शेलार, ॲड.पराग अळवणी, कॅप्टन आर.सेल्वन, सर्वश्री अमित साटम, पराग शाह, प्रशांत ठाकूर, मंगेश कुडाळकर, कुणाल पाटील, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री विक्रमसिंह सावंत, नानाभाऊ पटोले, ऋतुराज पाटील, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री बाळासाहेब थोरात, अमित झनक, जितेश अंतापूरकर, पृथ्वीराज चव्हाण, डॉ.राहूल पाटील, श्रीमती सीमा हिरे, श्री.नरेंद्र भोंडेकर, श्रीमती लताबाई सोनवणे, सर्वश्री दौलत दरोडा, बळवंत वानखडे, अनिल बाबर, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, सर्वश्री समीर कुणावार, अतुल भातखळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री महेश बालदी, मिहीर कोटेचा, समाधान अवताडे, संजय जगताप, अमिन पटेल, विकास ठाकरे, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री मोहनराव हंबर्डे, अस्लम शेख, सुनील केदार, शिरीष चौधरी, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री विनोद निकोले, दादाराव केचे, संजय रायमुलकर, वि.स.स.**

**टिप : अधिवेशन कालावधीत सदरहू लक्षवेधीवर चर्चा न झाल्यास सत्र समाप्तीच्या दिवशीच्या आदल्या कामकाजाच्या** दिवशी निवेदनाच्या ७०० प्रती सभागृहाच्या पटलावर ठेवणेकरिता या सचिवालयाकडे पाठविण्यात याव्यात. अंतिम निवेदन पाठविणे अगोदर लक्षवेधीचे प्रारुप व सुधारित नावांबाबत शाखेकडे खात्री करुन घ्यावी.) (Phone: 022-22027399 Ext : 2201, 2202 )